# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २३५- २३** **दिनांक : - २७/०७/२०२३**

## मोबाईल स्नॅचिंग करणाऱ्या आरोपींतास अटक - नायगाव पोलिस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २३/०७/२०२३ रोजी रात्रौ २३.५० वाजताचा सुमारास अहमदाबाद-मुंबई हायवे वरील मुंबई वाहीनीवर बापाने ब्रीज संपताच अहमदाबाद-मुंबई हायवेवरती फिर्यादी हे भाईदरला जाण्याकरिता रिक्षा पकडण्याकरिता आले असता नंबर नसलेल्या होन्डा कंपनीची मोटारसायकलवरील दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीच्या हातातील रेडमी कंपनीचा मोबाईल फिर्यादीच्या संमतिशिवाय लबाडीच्या इराद्याने स्वतःच्या फायद्याकरीता जबरीने खेचुन पळुन नेल्याबाबत फिर्यादीवरुन अनोळखी आरोपीतांविरुध्द नायगावा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद क्र. I २०८/२०२३ भां.द.वि.स कलम ३९२,३४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते त्या अनुषंगाने नायगाव पोलिस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकांची पथके नेमण्यात आली होती. गुप्तबातमीव्दारामार्फत व तांत्रिक विश्लेषनादवारे मिळालेल्या माहितीच्या आधारे बापाने परिसारातुन आरोपीत नामे नसीर जहीर खान, वय-२६ वर्षे राहणार- डोंगरपाडा, बिलालपाडा पुर्व नायगाव पुर्व ता. वसई जि. पालघर यास ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुशंगाने कौशल्यपुर्ण चौकशीकरिता केली असता असता त्यांनी व सोबत तौफिक शेख राहणार- बिलालपाडा नालासोपारा पुर्व यानी मिळुन नायगाव पोलीस ठाणे व वालीव पोलीस ठाणे अभिलेखावरील खालील गुन्हे केल्याचे निषन्न झल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीत यांचेकडुन गुन्हयातील चोरीस गेलेले मोबाईल, इतर मुददेमाल, व गुन्हा करतेवेळी वापरण्यात आलेली मोटारसायकल असा **एकुण** ९२,०००/- **रुपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील ०२ गुन्हे उघडकिस करण्यात यश आले आहे.

## -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | नायगाव | I २०८/२०२३ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे (मुळ गुन्हा ) |
| २. | वालीव | I ६३०/२०२३ भादविस कलम ३९२, ३४ प्रमाणे |

सदरची कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पोनि. श्री. मिलींद साबळे (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटिकरण पथकाचे सपोनि संतोष सांगवीकर,रोशन देवरे,पोहवा देविदास पाटील, अशोक लहामटे, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे,अशोक पाटील, अझर मस्ते, सोमीनाथ बोडके मसुब चव्हाण यांनी केली आहे.